महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८३ किंमत : ५ रु. | पाने ४

## दिन विशेष...

१६८९ : संगमेश्वरावर संभाजीराजेना कैद करण्यात आले.
१८३१ : ललित कला प्रदर्शन कलकत्ता येथे संपन्न झाले.
१८६४ : जगप्रसिध्द निग्रो कृषितज्ज्ञ जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांचा जन्मदिन.
१९५९ : रोहिणी मासिकाने शुभमंगलम मेळावा घेण्यास सुरुवात केली.

सेन्सेक्स ८२,२६९.७८ -२९६.५९ (०.३६%)
डॉलर ₹ ९१.९५

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १८ |
| दिल्ली | १९ | ०९ |
| मुंबई | ३२ | २२ |
| नागपूर | २९ | १६ |
| पुणे | ३१ | १३ |

### सुविचार

शाळेतील दिवस हे सोन्याच्या अक्षरांनी लिहिण्यासारखे असतात.

सुर्योदय - सुर्यास्त
स.-७:०५ संध्या-६:१७

### सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६८,१९५/- ३,९५,०००/-

### केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# महाराष्ट्राला लाभल्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

## ● राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या उपस्थितीत सुनेत्रा पवार यांनी घेतली साधेपणाने उपमुख्यमंत्री पदाची शपथ





वृत्तसंस्था । मुंबई

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर त्यांचा राजकीय वारसा पुढे कोण नेणार असा प्रश्न पडला होता. याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले होते.**

**अखेर अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी विराजमान होत त्यांनी आज सायंकाळी ५ वाजता मुंबईत उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या राज्याच्या १३ व्या उपमुख्यमंत्री असून, त्यांच्या रुपानं पहिल्यांदाच महाराष्ट्राला महिला उपमुख्यमंत्री मिळाल्या आहेत.**

मोजक्या नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने हा शपथविधी सोहळा लोकभवनातील दरबार हॉलमध्ये पार पडला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना मंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या कार्यक्रमासाठी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या बहीण सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्यासोबत लग्न केल्यानंतर स्वतः सामाजिक कार्यात झोकून दिले. त्यांचा सामाजिक प्रवास अनेकांसाठी प्रेरणा देणारा आहे. अजित पवार यांनी देखील त्यांच्या अनेक भाषणांमध्ये सुनेत्रा पवारांची त्यांच्या जीवनात मोलाची साथ लाभली असल्याचे वेळोवेळी सांगितले आहे. १९८५ मध्ये सुनेत्रा पवार यांचा अजित पवार यांच्यासोबत विवाह झाला. लग्नानंतर काटेवाडी येथे आल्यावर त्यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली. काटेवाडीमध्ये ग्रामस्वच्छता चळवळीची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. या कार्याची दखल (पान २ वर)

### सुनेत्रा पवार यांची ओळख

**१८ ऑक्टोबर १९६३ या दिवशी सुनेत्रा पवार यांचा धाराशिव या ठिकाणी जन्म झाला. त्या राजकीय पार्श्वभूमीवर असलेल्या कुटुंबातून येतात. त्यांचे बंधू पद्मसिंह पाटील हे मंत्री होते. त्यामुळे त्यांना राजकीय वारसा जन्मतःच लाभलेला आहे.**

## थोडक्यात



### महिला दुहेरीत मर्टेन्स-झांग जोडीचा ग्रँड धमाका!

**नवीदिल्ली ।** ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ च्या महिला दुहेरी आणि मिश्र दुहेरी स्पर्धांचे निकाल स्पष्ट झाले आहेत. अनुभवी एलिस मर्टेन्स आणि झांग शुआई या जोडीने आपल्या उत्कृष्ट समन्वयाच्या जोरावर महिला दुहेरीचे विजेतेपद पटकावले आहे. दुसरीकडे, यजमान ऑस्ट्रेलियन जोडीने मिश्र दुहेरीत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. महिला दुहेरी: ४-१ ने पिछाडीवर असतानाही दमदार कमबॅक चौथी मानांकित जोडी असलेल्या बेल्जियमच्या एलिस मर्टेन्स आणि चीनच्या झांग शुआई यांनी अंतिम सामन्यात ना डॅनिलिना आणि अलेक्झांड्रा क्रुनिक या जोडीचा ७-६(४), ६-४ असा पराभव केला. पहिल्या सेटमध्ये मर्टेन्स-झांग जोडी ४-१ ने पिछाडीवर होती, मात्र त्यांनी जिद्दीने खेळत हा सेट टायब्रेकरमध्ये जिंकला.

## नाशिक येथील कुंभमेळाव्यात ध्वजस्तंभाची उंची ५१ फूट राहणार

वृत्तसंस्था । नाशिक

**नाशिक येथे २०२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा पार्श्वभूमीवर ध्वजस्तंभ कसा असावा, तो कुठे उभारण्यात यावा, पताकाची रचना कशी असावी, यासंदर्भातील माहिती हाती आली आहे. यासंदर्भातील आढावा आणि नियोजन बैठक नाशिक येथील स्मार्ट सिटी मिशन कार्यालयात पार पडली.**

ही बैठक नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळ्याच्या काळात उभारण्यात येणाऱ्या ध्वजस्तंभ व पताकांचे नियोजन, स्थापत्य रचना, साहित्य निवड, उंचीचे निकष, धार्मिक व सांस्कृतिक प्रतीकात्मकता तसेच कामकाजाचे नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. ध्वजस्तंभ हे केवळ भौतिक संरचना नसून श्रद्धा, सांस्कृतिक वारसा व सामाजिक एकतेचे प्रतीक असल्याने त्यांची रचना व उभारणी अत्यंत संवेदनशीलतेने व जबाबदारीने करण्यात यावी, असे यावेळी अधोरेखित करण्यात आले. नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे एकसमान रचना राहील, यासाठी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करण्याचे निर्देश देण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रस्तावित नियोजन व रचनेबाबत सविस्तर सादरीकरण केले. ध्वजस्तंभ मजबूत व टिकाऊ पायाभरणीसह उभारण्यात येणार असून कोणत्याही प्रकारचे संरचनात्मक नुकसान होऊ नये याची काळजी घेतली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या पौराणिक महत्त्वाशी निगडित प्रतीकात्मक कोरीव काम, विशेषतः समुद्रमंथनाशी संबंधित संदर्भ, ध्वजस्तंभांवर समाविष्ट करण्यात येणार आहेत. बैठकीत ध्वजस्तंभांची उंची ५१ फूट आणि ३१ फूट अशी असणार असून त्यांची पायाभरणी अनुक्रमे १ फूट आणि ८ इंच त्रिज्येची असेल. ध्वजस्तंभाचा पाया साधा ठेवण्यात येईल, तर सजावटीचे व प्रतीकात्मक काम स्तंभावर करण्याच (पान २ वर)

## २०३० पर्यंत भारत मलेरियामुक्त होणार का?

वृत्तसंस्था । मुंबई

मलेरिया हा आजार एकेकाळी भारतातील सार्वजनिक आरोग्यासमोरील मोठे आव्हान मानला जात होता. मात्र गेल्या दशकात राबवण्यात आलेल्या लक्ष केंद्रीत उपाययोजनांमुळे या आजाराच्या प्रसारात लक्षणीय घट झाली आहे. २०१६ मध्ये केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन आराखड्यानुसार (२०१६-२०३०) भारताने २०३० पर्यंत मलेरियाचे संपूर्ण उच्चाटन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्याआधी, म्हणजे २०२७ पर्यंत देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये स्थानिक मलेरिया प्रसार खंडित करण्याचा टप्पा गाठण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. मात्र यात किती यश आले आहे हा कळीचा मुद्दा असून याचे ऑडिट होणे गरजेचे आहे.

## सुकमामध्ये ४ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण




वृत्तसंस्था । छत्तीसगड

**आठ लाख रुपयांचे एकत्रित बक्षीस असलेल्या, दोन महिलांसह चार नक्षलवाद्यांनी शुक्रवारी छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात शस्त्रे आणि दारूगोळ्यासह आत्मसमर्पण केले.**

माओवाद्यांच्या दक्षिण बस्तर विभागाच्या किस्ताराम क्षेत्र समितीशी संबंधित असलेल्या या कार्यकर्त्यांनी राज्याच्या पुना मार्गेम (पुनर्वसनापासून सामाजिक उत्थानापर्यंत) उपक्रमांतर्गत येथे आत्मसमर्पण केले. नक्षलवाद्यांनी पोलिसांना सांगितले की, ते राज्य सरकारच्या आत्मसमर्पण आणि पुनर्वसन धोरणाने प्रभावित झाले होते.

सुकमाचे पोलीस अधीक्षक किरण चव्हाण यांनी या भागात सक्रिय असलेल्या सर्व उर्वरित माओवादी कार्यकर्त्यांना हिंसाचार सोडून देण्याचे आवाहन केले असून, सरकार त्यांना सुरक्षा आणि (पान २ वर)

## मनमाड-इंदूर रेल्वे मार्ग रखडणार?



वृत्तसंस्था । मुंबई

**धुळे तालुक्यातून जाणाऱ्या प्रस्तावित मनमाड-इंदूर (बाळापूर ते पुरमेपाडा) रेल्वे मार्गासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. धुळे तालुक्यातील बाळापूर, वडजाई, पिंपरी, सावळदे, अवधान, लळींग, रानमळा, आर्वी व पुरमेपाडा या गावांतील बाधित शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.**

मनमाड-इंदूर (बाळापूर ते पुरमेपाडा) रेल्वेमार्गबाधित शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने ठाम भूमिका घेतली आहे.जोपर्यंत सर्व मागण्या पूर्ण होत नाहीत आणि शेतकऱ्यांना (पान २ वर)

## आरकॉमचे माजी अध्यक्ष अटकेत

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

आर्थिक गैरव्यवहारांच्या आरोपाखाली रिलायन्स कम्युनिकेशन्सचे (आरकॉम) माजी अध्यक्ष पुनीत गर्ग यांना अटक केल्याची माहिती सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी दिली. उद्योगपती अनिल अंबानी यांच्या समूहातील कंपन्यांविरोधात दाखल असलेल्या सुमारे ४० हजार कोटी रुपयांच्या कथित बँक कर्ज फसवणूक प्रकरणात ही कारवाई केल्याचे ईडीकडून सांगण्यात आले. ईडीने गुरुवारी ६१ वर्षीय गर्ग यांना ताब्यात घेतले.

## अर्थसंकल्पात आरोग्य विमा स्वस्त होणार?

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**देशातील वाढता वैद्यकीय खर्च आणि आरोग्य विम्याचा प्रीमियम (हप्ता) यामुळे त्रस्त असलेल्या मध्यमवर्गीय आणि ज्येष्ठ नागरिकांना आगामी अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.**

विमा उद्योगाने केंद्र सरकारकडे आरोग्य विमा, ओपीडी खर्च आणि सेवानिवृत्तीनंतरच्या उत्पन्नावर विशेष कर सवलत देण्याची आग्रही मागणी केली आहे. १ फेब्रुवारीला अर्थमंत्री निर्मला सितारामन केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत.




**ओपीडी खर्चावर सवलतीची गरज**

विमा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, भारतात रुग्णालयात दाखल होण्यापेक्षा बाह्यरुग्ण विभाग, औषधे आणि डायग्नोस्टिक चाचण्यांवर कुटुंबांचा सर्वाधिक खर्च होतो. एकूण वैद्यकीय खर्चाच्या जवळपास ६० टक्के हिस्सा हा ओपीडीवर खर्च होतो, परंतु सध्या त्यावर कोणतीही थेट कर सवलत मिळत नाही. जर सरकारने ओपीडी आणि प्रतिबंधात्मक उपचारांसाठी वेगळी कर सवलत दिली, तर वर्षाला ४५ हजार रुपये खर्च करणाऱ्या कुटुंबाची ६ ते ९ हजार रुपयांपर्यंत बचत होऊ शकते. (पान २ वर)

## चंडीगड महापौर निवडणुकीत भाजपची सरशी

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

चंडीगडमध्ये बहुमताचा आकडा नसतानाही गुरुवारी भाजपचे उमेदवार सौरभ जोशी यांची महापौरपदी निवड झाली. महापौरपद जिंकण्यासाठी १९ मतांची गरज होती, भाजपकडे फक्त १८ मते होती. तरीही, आप व काँग्रेसच्या सदस्यांच्या मतफुटीविना भाजपने ही निवडणूक जिंकली. आपकडे ११ तर, काँग्रेसकडे खासदार मनीष तिवारींसह ७ मते होती. दोन्ही पक्ष एकत्र आले असते तर समान मतांच्या आधारे भाजपला विजयापासून रोखता आले असते.

# दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यात भाजपकडून खोडा?

## अजित पवारांच्या पक्षाची सूत्रे सुनेत्रा पवारांकडे देण्याची खेळी भाजपने केली पडद्याआडून

वृत्तसंस्था । मुंबई

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यात भाजपकडून खोडा घातला जाण्याची चिन्हे असून त्यासाठी सुनेत्रा पवार यांचा उपमुख्यमंत्रीपदी शपथविधी घाईघाईने उरकण्यात येत असल्याचे उच्चस्तरीय सूत्रांनी सांगितले. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास अध्यक्ष शरद पवार हे पक्षाचा ताबा घेतील आणि वरिष्ठ नेत्यांना त्यांच्या सूचना डावलता येणार नाहीत, हे लक्षात घेवून अजित पवारांच्या पक्षाची सूत्रे सुनेत्रा पवारांकडे देण्याची खेळी भाजपने पडद्याआडून खेळली आहे.



अजित पवार यांच्या निधनानंतर दोन-तीन दिवसांतच सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षनेतृत्वाची धुरा देण्याच्या हालचाली सुरू करण्यात आल्या. अजित पवार यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्याच्या वेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा बारामतीला उपस्थित होते. त्यांनी परतताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी फडणवीस यांची मुंबईत भेट घेतली आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतानिवडीसाठी लगेच बैठक बोलाविण्याच्या हालचाली सुरू झाल्या. सुनेत्रा पवार यांच्याकडे पक्षाची धुरा देण्याचे आधीच ठरवून उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीची तयारीही सुरू करण्यात आली होती. यासंदर्भात सुनेत्रा पवार किंवा अन्य नेत्यांनी शरद पवार यांच्याशी कोणतीही चर्चा केली नाही. पक्षाची धुरा कोणाकडे द्यायची, हा राष्ट्रवादी (पान २ वर)

## ऑस्ट्रेलियन ओपनला मिळाली नवी टेनिस सम्राज्ञी!

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

**रॉड लेव्हर एरिनावर ३१ जानेवारी रोजी खेळवण्यात आलेल्या ऑस्ट्रेलियन ओपन २०२६ च्या महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात टेनिस विश्वाला नवी सम्राज्ञी मिळाली आहे.**



कझाकस्तानच्या एलिना रायबाकिना हिने जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या अरीना सबालेंका हिचा पराभव करत जेतेपदावर आपले नाव कोरले आहे. रायबाकिनाने हा अटीतटीचा सामना २-१ अशा सेटमध्ये जिंकून नवा इतिहास रचला.

अरिना सबालेंका या सामन्यात जेतेपदाची प्रबळ दावेदार मानली जात होती, परंतु रायबाकिनाने सुरुवातीपासूनच तिला दबावाखाली ठेवले. तिने पहिला सेट (पान २ वर)

## संपादकीय

### अर्थव्यवस्थेस गती हवी !

केंद्रीय अर्थसंकल्प फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस सादर करण्याचा स्वत:च केलेला नियम यावर्षी १ तारखेस रविवार असला तरी सरकार पाळणार आहे. यामुळे या रविवारी भांडवली बाजारही सुरू राहील. प्रथा ही की अर्थसंकल्पाच्या पूर्वसंध्येस आर्थिक पाहणी अहवाल सादर केला जातो. पण यंदा तसे नाही. यंदा हा आर्थिक पाहणी अहवाल २९ जानेवारीस सादर झाला. हे असे का, असे विचारण्यात काही अर्थ नाही हे आता सर्वांनाचा ठाऊक असल्याने त्या प्रश्नास स्पर्शही न करता आर्थिक पाहणी अहवालावर भाष्य करणे शहाणपणाचे आहे. केंद्र सरकारचे माजी अर्थसल्लागार अरविंद सुब्रमणियन यांनी रूक्ष आर्थिक पाहणी अहवालास वाचनीयता दिली. एरवी सरकारी खाती, संबंधित विभाग यांच्यापुरतीच ज्या विषयांची मर्यादा होती, ती सुब्रमणियन यांच्या कल्पकतेमुळे सहज ओलांडली गेली. रूक्ष आकडेवारी, जडजंबाळ शब्दप्रयोग इत्यादी कंटाळवाण्या मार्गाने न जाता सुब्रमणियन यांनी आर्थिक पाहणी अहवाल एखाद्या कथानकासारखा मांडायला सुरुवात केली. ते पदावरून गेले आणि अनंत नागेस्वरन आले. त्यांनी सुदैवाने हा पायंडा मोडला नाही. सुब्रमणियन यांच्या तुलनेत नागेस्वरन हे तसे कमी रसाळ. पण तरीही त्यांचा आर्थिक पाहणी अहवाल रोचक ठरतो. प्रथम त्यातील कथानकाविषयी. आगामी वर्षात जगात काय होईल याच्या तीन शक्यता हा आर्थिक पाहणी अहवाल वर्तवतो. पहिल्या शक्यतेनुसार जग २०२६ या वर्षात नियंत्रित गोंधळ (मॅनेज्ड डिसऑर्डर) अनुभवेल. दुसरी शक्यता ही बहुकेंद्री जगाच्या सर्व व्यवस्था ढासळतील (डिसऑर्डर्ली मल्टीपोलर ब्रेकडाऊन) आणि तिसऱ्या शक्यतेनुसार व्यवस्थेस बसणारे धक्के उत्तरोत्तर वाढत जातील (सिस्टेमिक शॉक कॅस्केड). यातील पहिल्या दोन अवस्था जगास अनुभवण्याची शक्यता या आर्थिक पाहणी अहवालानुसार ४०–४५ टक्के इतकी आहे तर तिसऱ्याची शक्यता आहे १० ते २० टक्के इतकी. या तीनही शक्यतांतील समान धागा असा की यापुढील जग हे नियमाने चालणारे, काही एक दिशा आणि उद्दिष्ट असलेले असेल असे सरकारला वाटत नाही. हे जग आता विस्कटलेले राहील, हे आपण गृहीत धरू लागलो असून या विस्कटलेपणात त्यातल्या त्यात आर्थिक टापटीप कशी राखता येईल याचा विचार हा अहवाल करतो. या तीनही शक्यतांत आणखी एक समान मुद्दा म्हणजे बाजाराची अस्थिरता. या वर्षात भांडवली बाजारात स्थिरता नसेल आणि अस्थिरता इतकी वाढेल की सरकारला अखेर हस्तक्षेप करावा लागेल, असे चिंताजनक भाकीत हा अहवाल वर्तवतो. थोडक्यात भांडवली बाजारातील गुंतवणूकदारांनी परताव्याबाबत फार आशावादी राहू नये. यात विरोधाभास आहे तो असे का होत आहे या कारणमीमांसेत आहेत. जगातील अनेक देश आत्मकेंद्रित होऊ लागल्याने जागतिक बाजारपेठेवर अशी वेळ आली, असे हा अहवाल म्हणतो. ते ठीकच. पण या आत्मकेंद्रित होऊ पाहणाऱ्या जगात आपणही कसे काय, या प्रश्नास भिडण्याचे बौद्धिक धाडस हा अहवाल दाखवत नाही. एका बाजूला युरोप, इंग्लंड, ओमान आदी देशांची मुक्त व्यापार करार करण्याची रास्त पावले आपण उचलत असताना जागतिक उत्पादनांच्या भीतीने स्वत:च्या सीमा अधिकाधिक बंद करण्यात आपण का स्वारस्य दाखवावे, हा प्रश्न. तो पडतो याचे कारण आपली अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने वाढणारी इत्यादी असली तरी जागतिक बाजारात आपण अजूनही शब्दश: नगण्य आहोत. उत्पादनांच्या क्षेत्रात भारताचा जागतिक बाजारातमधला वाटा आहे जेमतेम १.८ टक्के इतका आणि ज्यास आपण डोक्यावर घेतो त्या सेवा क्षेत्राचा वाटा जागतिक उलाढालीच्या तुलनेत ४.२ इतका आहे.यावरून आपणास निर्यात–अभिमुख व्यापारउदिमाची किती नितांत आवश्यकता आहे. यंदा ३१ मार्चला संपणाऱ्या आर्थिक वर्षात आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर किमान ७.४ टक्के इतका असेल असे सरकारतर्फेच सांगितले गेले होते. अर्थात ही गती वाढेल अशी अपेक्षा सरकारला आहे आणि त्यात काही गैर नाही.

# हिंदू राष्ट्र–जागृती सभेनिमित्त विराट वाहनफेरी

## जळगाव येथे वाहनफेरीत दुमदुमला हिंदुत्वाचा जयघोष!

प्रतिनिधी । जळगाव

**हिंदूंवर होणारे अन्याय आणि अत्याचार उघड करण्यासाठी, धर्मशिक्षणाने हिंदूंना संघटित करणे आणि 'हिंदू राष्ट्र स्थापने'ची पायाभरणी करण्यासाठी हिंदू जनजागृती समिती आणि समस्त हिंदुत्वावरी संघटना यांच्या वतीने आयोजित हिंदू राष्ट्र–जागृती सभेच्या प्रसारासाठी शनिवारी शहरात वाहनफेरीचे आयोजन करण्यात आले होते. यात शेकडो हिंदुत्वनिष्ठ आणि धर्मप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. फेरीत भगवे ध्वज, भगवे फेटे, टोप्या घातलेले हिंदू आणि 'जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् !' भारत मातेचा विजय असो, हिंदू एकजुटीचा विजय असो, हिंदूंनो जागे व्हा, वंदे मातरम् !' अशा घोषणांनी शहर भगवेमय झाले. या वातावरणात शौर्य आणि चैतन्याची लहर उसळली.**





वाहनफेरीला नवनिर्वाचित नगरसेवकांसह शेकडो धर्मप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद !



या फेरीसाठी सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाड्ये यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच या फेरीत भाजप, शिवसेना, शिवसेना शिंदे गट, शिव प्रतिष्ठान हिंदुस्थान, यासह विविध हिंदुत्ववादी या संघटना व मान्यवर मंडळी सहभागी झाले होते.

प्रारंभी बिग बाजार, नेहरू चौक येथे धर्मध्वजाचे पूजन जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष सतीश मदाने आणि सनातन संस्थेचे धर्म प्रसारक सद्गुरु नंदकुमार जाधव यांच्या हस्ते झाले. ही फेरी, टॉवर चौक, चित्रा चौक, श्रीइच्छापूर्ती गणेश मंदिराजवळ श्याम कोगटा यांनी ध्वज पूजन केले. कोर्ट चौक येथे अधिवक्ता मंडळाने स्वागत केले. गणेश कॉलनीमध्ये नगरसेविका दीपमाला काळे, नगरसेवक चंद्रशेखर अत्तरदे यांनी फेरीचे स्वागत केले. सुकृती पॅनलजवळ नगरसेवक मनोज चौधरी तर पिंप्राळा चौकात माजी उपमहापौर कुलभूषण पाटील यांनी सरबत वितरणाचे नियोजन केले होते.

या स्वागत फेरीवर फुले उधळली व रांगोळ्या काढल्या होत्या. पिंप्राळा येथील शिवस्मारकजवळ समारोपावेळी हिंदू जनजागृती समितीच्या कु.रागेश्री देशपांडे यांनी दि.१ फेब्रुवारी रोजी मानराज पार्क येथे होणाऱ्या सभेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.

वाहन फेरीत नवनिर्वाचित नगरसेवक मनोज चौधरी, राहुल पाटील, कविता पाटील, माजी उपमहापौर कुलभूषण पाटील, श्याम कोगटा, कैलास सोनवणे, प्रतीक्षा सोनवणे, कल्पेश सोनवणे, मुकुंदा सोनवणे, दीपमाला काळे, माजी महापौर सीमा भोळे, उज्वला बेंडाळे, अतुल बारी यांच्यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

## अवकाळी पावसात नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे : पालकमंत्री

प्रतिनिधी । जळगाव



जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी प्रशासनाला तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या माध्यमातून नियमानुसार मदत दिली जाईल. अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या असून शासन त्यांच्या पाठीशी खंबीर पणे उभे आहे, असे आश्वासन जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.

गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्र्यांनी आज धरणगाव तालुक्यातील बोरगाव बुद्रुक, गारखेडा, पष्टाने बुद्रुक तसेच जळगाव तालुक्यातील करंज, धानोरा व धार्डी या गावांमधील नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीदरम्यान संबंधित गावांमध्ये शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे त्यांनी आपली नावे तलाठी कार्यालयात नोंदवावीत. त्यानंतर संबंधित ठिकाणी पंचनामे करण्यात येऊन त्यांची यादी ग्रामपंचायत कार्यालयात प्रसिद्ध करण्यात यावी, अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देवून अनेक भागांमध्ये विजेचे खांब कोसळून वीजपुरवठा खंडित झाला असून, तुटलेल्या वीज तारा व खांबांची तात्काळ दुरुस्ती करण्याचे आदेश महावितरण अधिकाऱ्यांना देण्यात आले.

यावेळी शेतकऱ्यांनी आपल्या समस्या व निवेदने पालकमंत्र्यांकडे सादर केली. पाहणी दौऱ्यादरम्यान पालकमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय मिळवून दिला जाईल, असे आश्वासन दिले.

या दौऱ्यावेळी अपर जिल्हाधिकारी श्रीमंत हारकर, जिल्हा कृषी अधिकारी कुर्बान तडवी, गटविकास अधिकारी किशोर वानखेडे, तहसीलदार शितल राजपूत, नायब तहसीलदार लक्ष्मण सातपुते, मंडळ अधिकारी आशिष वाघ, ज्योती चौधरी, तालुका कृषी अधिकारी के. एच.देसले, तलाठी जीवनकुमार खोकले, ज्योती लोखंडे तसेच संबंधित गावांचे सरपंच, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चोरीच्या तीन मोटर सायकली जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची करवाई



प्रतिनिधी । जळगाव

स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांनी जामनेर पोलिस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यातील २ मोटारसायकल तसेच भुसावळ शहर पोलिस स्टेशन येथील १ मोटारसायकल असे चोरीची एकूण ३ मोटारसायकल स्थानिक गुन्हे शाखा, जळगाव यांना मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारे आरोपी अनुराग लक्ष्मण सुनगत (वय १९ रा. वाकी रोड,हरी ॐ नगर, जामनेर), दर्शन बाप्पू चव्हाण (वय १८ रा.संत सेवालाल नगर, जामनेर) या दोघांना ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी या ३ मोटारसायकल त्यांचा एक साथीदार यांच्या मदतीने चोरी केल्याची कबुली दिली आहे.

तपासदरम्यान आरोपींकडून चोरीस गेलेल्या ३ मोटारसायकल जप्त करण्यात आल्या आहेत. जामनेर पोलिस स्टेशन येथे दाखल गुन्हा रजि नंबर १८/२०२६ BNS ३०३(२), गुन्हा रजिनंबर ३८/२०२६ BNS ३०३(२) असे २ मोटारसायकल तसेच भुसावळ शहर पोलिस स्टेशन गुन्हा रजिनंबर १७७/२०२४ BNS ३०३(२) असा मुद्देमाल आरोपींकडून जप्त करण्यात आला असून या आरोपींसह चोरीच्या ३ मोटारसायकल असा मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईकामी जामनेर पोलिस स्टेशन येथे त्यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलिस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अप्पर पोलिस अधीक्षक अशोक नखाते, स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल गायकवाड, पोलिस उपनिरीक्षक शरद बागल, ग्रेड पोलिस उपनिरीक्षक रवी नरवाडे, पोहेकॉ गोपाळ गव्हाडे, पोहेकॉ उमाकांत पाटील, पो.ना. विकास सातदिवे, पो.कॉ. प्रशांत परदेशी, पो.कॉ. राहुल वानखेडे यांच्या पथकाने केली.

## पान १ वरुन

**महाराष्ट्राला लाभल्या पहिल्या......**

घेत देश–विदेशातून अभ्यासकांनी काटेवाडीला भेट दिली. याच कामामुळे सुनेत्रा पवार यांना सार्क देशांच्या साकोसान परिषदेत सहा राष्ट्रप्रमुखांसमोर भाषण करण्याची संधी मिळाली. त्यांच्या या प्रेरणेतून ग्रामस्वच्छता अभियानात काटेवाडीने राज्यात प्रथम क्रमांक पटकाला. यात सुनेत्रा पवार यांनी महत्वाची भूमिका बजावली होती. सुनेत्रा पवार यांनी विविध उपक्रम राबवले आहेत. महिलांमध्ये कर्करोगाविषयी जागृती या अत्यंत महत्वाच्या अशा उपक्रमाद्वारे जनजागृती करण्याचे काम त्यांनी केले. सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताच त्यांच्या नावावर आज पहिली महिला उपमुख्यमंत्री असा एक मोठा विक्रम झाला आहे.

**सुकमामध्ये ४ नक्षलवाद्यांचे......**

सन्मानजनक जीवन प्रदान करेल, असे आश्वासन दिले आहे. आत्मसमर्पण केलेल्या कार्यकर्त्यांपैकी, क्षेत्र समिती सदस्य सोढी जोगावर ५ लाख रुपयांचे बक्षीस होते. इतर, डबर गंगा उर्फ मदकम गंगा, सोढी राजे आणि माडवी बुधारी यांच्यावर प्रत्येकी १ लाख रुपयांचे बक्षीस होते. एक इन्सास रायफल, एक सिंगल लोडिंग रायफल, एक .३०३ रायफल आणि एक ३१५ रायफल, तसेच दारूगोळा नक्षल्यांनी पोलिसांच्या स्वाधीन केला. त्यांच्या आत्मसमर्पणात सुकमा जिल्हा आणि आंध्र प्रदेशच्या अल्लुरी सीताराम राजू जिल्ह्याच्या पोलिसांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या आत्मसमर्पणामुळे, या वर्षी राज्यात आतापर्यंत २०० हून अधिक नक्षलवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवली आहेत. **ऑस्ट्रेलियन ओपनला......**

आपल्या आक्रमक सर्व्हिसच्या जोरावर ६–४ असा जिंकून १–० अशी आघाडी घेतली. त्यानंतर दुसऱ्या सेटमध्ये सबालेंकाने जोरदार पुनरागमन केले. तिने रिबाकिनाला कडवी झुंज देत ६–४ ने हा सेट जिंकला आणि सामना १–१ च्या बरोबरीवर आणला.

**अर्थसंकल्पात आरोग्य......**

सध्या प्राप्तिकर कायद्याच्या कलम ८०डी अंतर्गत आरोग्य विम्याच्या प्रीमियमवर २५ हजार रुपयांपर्यंत कर सवलत मिळते. विमा उद्योगाने ही मर्यादा वाढवून ५० हजार रुपये करण्याची मागणी केली आहे. जर ही मागणी मान्य झाली, तर ३० टक्के टॅक्स स्लॅबमध्ये येणाऱ्या नागरिकांची कर बचत दुप्पट होईल. कारण सध्या वैद्यकीय महागाईचा दर ११.५ ते १४ टक्क्यांच्या दरम्यान असून, यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोलमडले आहे.

**मनमाड–इंदूर रेल्वे मार्ग......**

विश्वासात घेतले जात नाही, तोपर्यंत शासनाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याला, प्रतिनिधीला किंवा भूसंपादन प्रक्रियेला सहकार्य केले जाणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, सध्या प्रस्तावित मोबदला हा बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत अपुरा आहे. शासनाचा कोणताही कायदा शेतजमिनीचे योग्य व वास्तव मूल्यांकन करू शकत नाही, असा शेतकऱ्यांचा आरोप आहे. जमीन अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांची शेती, उत्पन्नाचे मुख्य साधन आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह धोक्यात येणार आहे. बागायती व सिंचन सुविधा असलेल्या सुपीक जमिनीचा मोठ्या प्रमाणावर नाश होणार आहे. संबंधित शेतकरी व ग्रामसभेत सविस्तर चर्चा व सहमती न घेता ही प्रक्रिया राबवली जात असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

**नाशिक येथील कुंभमेळाव्यात......**

सर्वानुमते ठरविण्यात आले. या बैठकीस नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री, शहर अभियंता संजय अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल के. पाटील, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता स्नेहल पगारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अविनाश डी. देवरे, सहाय्यक अभियंता अमोल अरुण कोर्डे, नाशिक महानगरपालिकेचे उपअभियंता समीर रकाटे, नगररचना विभागाचे उपअभियंता ए. बी. राऊत, कलाकार व शिल्पकार प्रमोद कांबळे, आदी उपस्थित होते.

**दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस......**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडून भाजपने अजित पवार यांना आपल्याबरोबर आणले होते. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्यासाठी बारा फेब्रुवारीचा मुहूर्तही ठरला होता. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र आल्यास शरद पवार यांचा निर्णय अंतिम राहील, ते आणि खासदार सुप्रिया सुळे यांचा निर्णय प्रक्रियेत वरचष्मा राहील.म्हणून राजकीय व्यूहरचनेतून सुनेत्रा पवार यांच्याकडे अजित पवार यांच्या पक्षाची धुरा घाईघाईने दिल्याची चर्चा रंगली आहे.

## धरणी नाल्यात घाणीचे साम्राज्य; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरूच!

प्रतिनिधी । धरणगाव



शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणाऱ्या धरणी नाल्याची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली असून संपूर्ण नाला प्लास्टिक, कागद, खाद्यपदार्थांचे रॅपर, बाटल्या व विविध प्रकारच्या कचऱ्याने अक्षरशः भरून गेला आहे. नाल्यात साचलेल्या घाणीमुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाला आहे.

शहरातील वर्दळीच्या भागात असलेल्या या नाल्याकडे पालिका प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. नाल्याची नियमित साफसफाई होत नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या परिसरातून रोज हजारो नागरिक, विद्यार्थी, व्यापारी व वाहनधारक ये–जा करतात. मात्र नाल्यात उघड्यावर साचलेली घाण, डबकी पाणी व दुर्गंधी यामुळे अपघाताचा धोका वाढला असून संसर्गजन्य आजार पसरण्याची शक्यताही नाकारता येत नाही. नाला सफाईबाबत अनेक वेळा तोंडी सांगून अद्याप ठोस कारवाई झालेली नाही. नाल्यात थेट कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने ही समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. स्वच्छ शहरचा नारा देणाऱ्या धरणगाव पालिका प्रशासनाने प्रत्यक्षात मात्र या मूलभूत प्रश्नाकडे पाठ फिरवली आहे, असा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे.

धरणगाव शहराच्या सौंदर्यावर डाग लावणाऱ्या या घाणीच्या साम्राज्यावर तात्काळ उपाययोजना कराव्यात, नाल्याची यांत्रिक पद्धतीने साफसफाई करावी, नियमित देखरेख ठेवावी तसेच कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांतून होत आहे.

# आ.खडसेंकडून पवार कुटुंबियांचे सांत्वन

## विमान दुर्घटनेस्थळी प्रत्यक्ष जाऊन उपस्थितांकडून घेतली अपघाताची माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचेवर काल अंत्यसंस्कार करण्यात आलेत. बारामतीतील विद्या प्रतिष्ठान येथे आज सकाळी त्यांच्या अस्थि संचयनाचा विधी पार पडला त्यावेळी माजीमंत्री शरद पवार यांच्यासह संपूर्ण पवार कुटुंबियांसोबत माजीमंत्री आ.एकनाथराव खडसे यांनी उपस्थित राहुन अजितदादांच्या अस्थिंचे दर्शन घेऊन त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. तसेच आ. खडसे यांनी शरद पवार यासह, खा.सुप्रिया सुळे, पार्थ पवार, जय पवार यांचे सांत्वन करत धीर देण्याचा प्रयत्न केला.**



यावेळी सदानंद सुळे, आ. रोहित आर. पाटील यांची उपस्थिती होती. तसेच आ.खडसेंसोबत जळगाव जिल्ह्यातील बोदवड पंचायत समितीचे माजी सभापती गणेश पाटील, मार्केट कमिटी संचालक ज्ञानेश्वर पाटील, शिरसाळा सरपंच प्रवीण पाटील, मानमोडीचे सतीश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बोदवड तालुकाध्यक्ष आबासाहेब पाटील, डॉ. अभिषेक ठाकूर, गजानन पाटील, सुरवाडा येथील निलेश गावंडे, दिलीप पौड, पवन देवकर, दीपक काजळे आदी उपस्थित होते. तसेच विद्या प्रतिष्ठान येथून खडसेंनी थेट अपघात स्थळी जाऊन नेमकी एवढी मोठी दुर्घटना कशी घडली हे जाणून घेण्यासाठी बारामती विमानतळाच्या धावपट्टीनजीकच असलेल्या अपघात स्थळाची पाहणी करून उपस्थित अधिकारी व प्रत्यक्षदर्शींकडून घडलेल्या दुर्दैवी घटनेची माहिती जाणून घेतली. त्याठिकाणी अजितदादा यांच्या फाईल्स व कागदाचा खच बघून आ.खडसे भावूक झालेत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### प्रा.डॉ. देवरे यांना उत्कृष्ट निवेदक पुरस्कार

**नंदुरबार ।** येथील श्रीमती हि. गो. श्रॉफ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रा.डॉ.दिनेश बबन देवरे आहे. तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीपर्यंत त्यांनी विविध क्षेत्रात सूत्रसंचालन केले आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना हा जगरास्य करडक भीगर से समुह नृत्य यांना उत्कृष्ट निवेदक पुरस्कार देण्यात आला. सदर पुरस्कार नंदुरबार डिस्टिक कल्चरल फाउंडेशनच्यावतीने देण्यात आला. प्रा.डॉ.देवरे यांनी विविध क्षेत्रात सूत्रसंचलन उत्कृष्ट पद्धतीने कार्य केले पुरस्कार देण्यात आला.

### जुन्या वादातून तिघांकडून एकास मारहाण

**नंदुरबार ।** मागील भांडणाची कुरापत काढून कामोद गावाच्या यात्रेत तिघांनी एकास मारहाण केल्याची घटना घडली. दि. २५ जानेवारी रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास मागील भांडणाची कुरापत काढून अजय, विजय व वेच्या (तिन्ही रा. माणीषपुर, ता. उच्छल, जि. तापी) यांनी निलेश विजय गावित यास शिवीगाळ करुन हाताबुक्यांनी मारहाण केली. तसेच लोखंडी फायटरने तोंडावर व उजव्या बाजुस गालावर मारुन दुखापती केले. याबाबत विसरवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ई-प्रणालीमुळे बोगस प्रमाणपत्रांना बसणार आळा

## खेळाडूंच्या आरक्षणासाठी क्रीडा ई-प्रमाण प्रणाली विकसित; २४ तासांत मिळणार पडताळणी अहवाल

प्रतिनिधी । नंदुरबार

**राज्यातील खेळाडूंना शासकीय सेवांमध्ये मिळणाऱ्या ५ टक्के आरक्षणाचा लाभ अधिक सुलभ, पारदर्शक आणि जलद गतीने मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने क्रीडा ई-प्रमाण ही अद्ययावत प्रणाली विकसित केली आहे. त्यामुळे बोगस प्रमाणपत्रांना आळा बसणार आहे.**

कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या या प्रणालीमुळे आता खेळाडूंच्या प्रमाणपत्रांची पडताळणी मानवी हस्तक्षेपाशिवाय डिजिटल पद्धतीने होणार आहे, अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी सुनंदा पाटील यांनी दिली.

क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेतील मानवी हस्तक्षेप कमी करणे, बोगस प्रमाणपत्रांना आळा घालणे आणि पडताळणीसाठी होणारा विलंब टाळणे हा या नव्या प्रणालीचा मुख्य उद्देश आहे. संघटनांवर सात दिवसांचे बंधन नव्या नियमांनुसार, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील सर्व अधिकृत क्रीडा संघटनांना स्पर्धेचा अंतिम निकाल आणि सहभागी खेळाडूंची यादी स्पर्धा संपल्यापासून ७ दिवसांच्या आत क्रीडा विभागाच्या पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. ही माहिती स्मार्ट कॉन्ट्रॅक्टद्वारे ब्लॉकचेनवर कायमस्वरूपी जतन केली जाईल. विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या संघटनांना स्वयंचलितरित्या डिफॉल्टर यादीत टाकले जाईल.

### ➤ अर्जची अपील सुविधा

अर्ज फेटाळला गेल्यास ३० दिवसांच्या आत ऑनलाइन अपील करण्याची सोय असून, अपीलाचा निकालही ब्लॉकचेनवर नोंदवला जाईल. भरतीसाठी क्रीडा ई-प्रमाणपत्र अनिवार्य, आगामी सर्व पदभरती प्रक्रियांसाठी ही कार्यपद्धती लागू राहणार आहे. खेळाडूने गट अ ते ड मधील पदांसाठी अर्ज करताना या क्रीडा ई-प्रमाणपत्राची प्रत जोडणे अनिवार्य आहे. त्याशिवाय खेळाडू संवर्गातून अर्जाचा विचार केला जाणार नाही. ही प्रक्रिया राज्यातील सर्व खेळाडू आणि क्रीडा संघटनांवर बंधनकारक राहील, असेही जिल्हा क्रीडा अधिकारी, सुनंदा पाटील यांनी कळविले आहे.

**खेळाडूंना मिळणार इन्स्टंट पडताळणी आधार संलग्न लॉगिन**

खेळाडूंनी त्यांच्या आधार-संलग्न आयडीद्वारे पोर्टलवर लॉगिन करून अर्ज करायचा आहे. कार्यालयात जाण्याची गरज नाही. खेळाडूची माहिती आणि संघटनेने दिलेला डेटा याची जुळवणी झाल्यास, कोणत्याही कार्यालयात प्रत्यक्ष न जाता पडताळणी अहवाल तत्काळ किंवा कमाल २४ तासांच्या आत उपलब्ध होईल. क्युआर कोडद्वारे सुरक्षितता प्रत्येक प्रमाणपत्रावर एक अद्वितीय क्युआर कोड असेल, जो स्कॅन करून नियुक्ती प्राधिकारी (महाराष्ट्र लोकसेवा आयोग) मूळ नोंदीशी पडताळणी करू शकतील,असेही त्यांनी सांगितले.

### सातपुड्याच्या जंगलात भीषण आग; वनसंपत्ती जळून खाक

प्रतिनिधी । धडगाव

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा-धडगाव घाटात सातपुड्याच्या घनदाट जंगलाला भीषण आग लागली. अज्ञात समाजकंटकांकडून ही आग लावली जात असल्याचा संशय व्यक्त होत आहे. यात मौल्यवान वनसंपत्ती जळून खाक होत आहे. नंदुरबार शहादा-धडगाव जिल्ह्यातील घाटात सातपुड्याच्या घनदाट जंगलाला भीषण आग लागली. गेल्या काही दिवसांपासून धगधगत असलेल्या या वनव्यामुळे अनेक जुने आणि मोठे वृक्ष जळून कोळसा झाले आहेत. आगीच्या वाढत्या तीव्रतेमुळे सातपुड्यातील दुर्मिळ वन्यजीवांचे अधिवास धोक्यात आले असून, प्राण्यांना जीव वाचवण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

## हमदर्द फाउंडेशन-हाश्मी कमिटीतर्फे ९ जोडप्यांचा सामूहिक विवाह



प्रतिनिधी । नंदुरबार

हमदर्द फाउंडेशन आणि हाश्मी कमिटीच्यावतीने सालाबादाप्रमाणे यावर्षीही पारंपरिक आणि धार्मिक वातावरणात सामूहिक विवाह सोहळा शहरातील रज्जाक पार्क येथे पार पडला.

कार्यक्रमाचे आयोजन हाजी सैय्यद मोहम्मद शफी बापू मेमोरीयल ट्रस्ट गुजरात, हमदर्द फाउंडेशन नंदुरबार आणि हाश्मी कमिटी नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या सोहळ्यात ९ जोडप्याचा विवाह मुस्लिम पारंपरिक विधीनुसार लावण्यात आला. या विवाह समारंभात पारंपरिक, साधेपणा, सामाजिक ऐक्य, सलोखा आणि कमी खर्चात विवाह व बचत करण्याचा संदेश देण्यात आला. या सोहळ्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## भुजगाव ग्रामपंचायतला आदर्श पुरस्कार

प्रतिनिधी । धडगाव

नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या जागतिक कृषी महोत्सव २०२६ मध्ये महाराष्ट्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सरपंचांचा आदर्श सरपंच म्हणून गौरव करण्यात येत आहे. याच अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यातील अतिदुर्गम धडगाव तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत भुजगाव यांना सन २०२६ चा प्रतिष्ठेचा कृषी माऊली सन्मान आदर्श सरपंच पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

ग्रुप ग्रामपंचायत भुजगाव अंतर्गत जलसंवर्धन, माती संवर्धन, पर्यावरण संरक्षण, रोजगाराभिमुख उपक्रम, बचत गटांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण, जैवविविधता संवर्धन, प्रभावी ग्राम प्रशासन तसेच मूलभूत व पायाभूत सुविधांच्या विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. ग्रुप ग्रामपंचायत भुजगावच्या वतीने हा पुरस्कार लोकनियुक्त सरपंच अर्जुन पावरा, उपसरपंच कविता पावरा, ग्रामपंचायत सदस्य कैलास पावरा, दिलीप पावरा, रविंद्र पावरा, शंकर पावरा, ग्राम रोजगार सेवक सुभाष पावरा, तसेच दिनेश पाडवी व संदीप पावरा यांनी स्वीकारला. हा सन्मान अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ, त्र्यंबकेश्वर व प्रधान केंद्र दिंडोरी प्रणित जागतिक कृषी महोत्सव अंतर्गत, पिठाचे पिठाधीश प.पु. गुरुमाऊली व गुरुपुत्र आबासाहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी लोकनियुक्त सरपंच अर्जुन पावरा यांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या विविध विकासात्मक उपक्रमांची सविस्तर माहिती उपस्थितांसमोर मांडली. याबाबत ग्रामसेवक मोहनलाल वळवी यांनी सांगितले की, भुजगाव ग्रामपंचायतीने संघभावनेने व नियोजनबद्ध पद्धतीने केलेल्या कामांचे हे फलित आहे. लोकनियुक्त सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच हे यश मिळाले आहे. भविष्यातही शाश्वत विकास, पर्यावरण संरक्षण व लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविण्याचा आमचा निर्धार असल्याचे सांगितले.

## महाराष्ट्रासाठी अजितदादांचे योगदान सदैव स्मरणात राहील : आ.अमरिशभाई पटेल



प्रतिनिधी । शिरपूर

**शिरपूर भारतीय जनता पार्टीतर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शिरपूर येथील जनक विला, आमदार कार्यालयाच्या प्रांगणात माजीमंत्री आ. अमरिशभाई पटेल, आ. काशिराम पावरा व अनेक मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.**

यावेळी आ. अमरिशभाई पटेल यांनी अतिशय दुःखी होऊन स्व. अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. ज्येष्ठ नेते खा. शरद पवार व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी अतिशय जिव्हाळ्याचे, कौटुंबिक व सहानुभूतीपूर्ण नाते होते. महाराष्ट्राला पुढे नेण्याचे व जनतेला न्याय देण्याचे काम त्यांनी मनापासून केले. शिस्तप्रिय व अभ्यासू मंत्री म्हणून आम्ही त्यांच्याकडे नेहमी पाहत होतो. त्यांच्या कामकाजातील काटेकोरपणा, निर्णयक्षमता आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यासाठी ते परिचित होते. महाराष्ट्राच्या राजकारणात अजितदादांनी दिलेले योगदान सदैव आमच्या स्मरणात राहील, असे सांगून अमरिशभाईंनी श्रद्धांजली अर्पण केली.

शिरपूरच्या अनेक विकासकामांसाठी त्यांनी मदत केली. अजितदादा गेल्याने महाराष्ट्र राज्याचे फार मोठे नुकसान झाले आहे, असेही ते म्हणाले. आ. काशिराम पावरा यांनी अजित पवार यांच्या सोबतच्या विधान भवनातील व मंत्रालयातील आठवणी सांगून अतिशय अभ्यासू नेते आपल्यातून गेल्याचे दुःख प्रकट केले. यावेळी भाजपा माजी जिल्हाध्यक्ष बबनराव चौधरी, माजी जि.प.अध्यक्ष डॉ.तुषार रंधे, बाजार समिती सभापती के. डी. पाटील, माजी जि.प.उपाध्यक्ष देवेंद्र पाटील, सुभाष कुलकर्णी, नरेंद्रसिंग राजपूत, नारायणसिंग चौधरी, भाजपा ग्रामीण अध्यक्ष भरत पाटील, सांगवी मंडळ अध्यक्ष योगेश बादल, थाळनेर मंडळ अध्यक्ष विरुपाल राजपूत, माजी तालुकाध्यक्ष किशोर माळी, सूतगिरणी उपाध्यक्ष संग्रामसिंग राजपूत, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष कैलासचंद्र अग्रवाल, अनु. जाती आघाडी जिल्हाध्यक्ष पिंटू शिरसाठ, महिला अध्यक्ष डॉ. जयश्री निकम, नगरपरिषदेचे शिक्षण सभापती शामकांत ईशी, बांधकाम सभापती वासुदेव देवरे, आरोग्य सभापती डॉ.वृषाली बडगुजर, पाणीपुरवठा सभापती गणेश सावळे, बाबुलाल महाजन, बाळासाहेब पाटील, पप्पू पाटील, शहर भाजयुमो अध्यक्ष संदीप माळी, भालेराव माळी, पिंटू माळी, राज सिसोदिया, मिलिंद पाटील, योगेश बोरसे, विजय बागुल, दर्यावसिंग जाधव, अरुण धोबी, ॲड. बाबा पाटील, राकेश पाटील, देवेंद्र राजपूत, अविनाश पाटील, जगतसिंग राजपूत, जयवंत पाडवी, रमण पावरा, कैलास पावरा, प्रेमचंद शिरसाठ, ॲड. शालिनी सोनवणे, कल्पना कोळी, चारु पाटील, योगेंद्रसिंग सिसोदिया, संजय जाधव, नरेंद्र पाटील, संजय पाटील, मामा पाटील, चंद्रकांत पाटील, विजय पवार, संजय आसापुरे, शिरीष पाटील, संदीप पाटील, दिनेश पाटील, सुनील पाटील, किशोर चव्हाण, जयसिंग राजपूत, संतोष जाधव, अनारसिंग जाधव उपस्थित होते. प्रस्ताविक के. डी. पाटील यांनी केले आभार भरत पाटील यांनी मानले.

## अवैध वसुलीमुळे बेडकीपाडा चेक पोस्ट वादाच्या भोवऱ्यात

### ड्रायव्हर संघटनेकडून आंदोलन; मारहाणीसह धमकीचे गंभीर आरोप

प्रतिनिधी । नवापूर

**महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील नवापूर तालुक्यातील बेडकीपाडा येथील महाराष्ट्र राज्य आंतरराज्य सीमा तपासणी नाका (आरटीओ चेक पोस्ट) पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. चेक पोस्टवरील काही अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून नियमबाह्य पद्धतीने चलन आकारून वाहनचालकांकडून अवैध वसुली केली जात असल्याचा गंभीर आरोप ड्रायव्हर संघटनांनी केला आहे.**





मालवाहतूक वाहनचालकांकडून होणारी कथित अवैध वसुली, दमदाटी, मारहाण व धमकी याबाबतच्या तक्रारी भारत ड्रायव्हर महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश कुमार जांगडा यांच्याकडे करण्यात आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर संघटनेच्या नेतृत्वाखाली आज बेडकीपाडा चेक पोस्टवर मोठ्या संख्येने चालक एकत्र आले. यावेळी चालकांनी काही काळ चक्काजाम आंदोलन करून निषेध व्यक्त केला. ड्रायव्हर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, चेक पोस्टवर नियमबाह्य पद्धतीने दंड आकारला जात असून, अवैध वसुलीला विरोध करणाऱ्या चालकांना मारहाण व धमकी दिली जाते. अशा प्रकारांमुळे वाहनचालकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे. आंदोलनामुळे चेक पोस्ट परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. वाहतूक ठप्प झाल्याने महामार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी नवापूर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मध्यस्थी केली व वाहतूक सुरळीत केली. दरम्यान, नवापूर चेक पोस्ट व वजन काटा वादाच्या भोवऱ्यात सापडत असल्याचे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर एका वाहनचालकाने चेक पोस्टवरील कथित लूट व अवैध वसुलीबाबतचा व्हिडिओ पोस्ट केला होता. तो मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. या व्हिडिओनंतर मालवाहतूक चालकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. चालक संघटनेने संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे.

## अलिम्को मोजमाप शिबिरात १५० दिव्यांग विद्यार्थ्यांची तपासणी

प्रतिनिधी । धुळे

**समग्र शिक्षा अभियानांतर्गत धुळे महापालिका शिक्षण मंडळातर्फे समावेशित शिक्षण उपक्रमांतर्गत दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी अलिम्को संस्थेमार्फत साहित्य साधनांचे मोजमाप शिबीर घेण्यात आले. त्यात १५० विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.**



शिबिरात धुळे महापालिका ते १८ १५० कार्यक्षेत्रातील वयोगटातील एकूण विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १२७ दिव्यांग विद्यार्थ्यांना व्हीलचेअर, सीपी चेअर, ट्रायसिकल, रोलेटर, श्रवणयंत्र, स्मार्ट काठी, ब्रेल किट, क्रचेस, कॅलिपर व इतर आवश्यक साहित्य साधने संदर्भित करण्यात आली. अलिम्को संस्थेमार्फत डॉ. गौरव पाडवी, मयूर वर्मा, विजय मार्कंड व ज्ञानेश्वर जाधव यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून आवश्यक मोजमाप घेतले. या उपक्रमामुळे दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडून येण्यास मदत होणार आहे.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा समन्वयक गोपाल पवार, मनपा शाळा क्र ३ चे मुख्याध्यापक उदय केदार यांचे सहकार्य लाभले. तर मनपा शिक्षण मंडळाच्या विशेष शिक्षकांनी विशेष प्रयत्न केले. या शिबिराचे आयोजन आयुक्त नितीन कापडणीस, मनपा शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी विश्वभर दासरवाड, जितेंद्रसिंग सिसोदिया, तुषार गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

### आमलाड परिसरात नीलगायचा धुमाकूळ

प्रतिनिधी । तळोदा

तालुक्यातील आमलाड शिवारात अतुल सूर्यवंशी यांच्या शेतात अंधारात निलगाय चरताना आढळून आल्याने शेतकऱ्यांमध्ये पिकांच्या नुकसानीची भीती निर्माण झाली आहे.

गेल्या काही काळापासून तळोदा तालुक्यात बिबट्यांचा वावर सातत्याने आढळत असल्याने नागरिक भयभीत होते. त्यानंतर आता बिबट्यांच्या जागी निलगाय तसेच हरणांचा वावर वाढला. परंतु अद्याप नील गाय आहे की हरिण याबाबत चर्चाच सुरु आहेत. एक महिन्यापूर्वी कलसाडी येथील जगदीश चौधरी यांच्या गावाजवळील दादराच्या शेतात निलगाय चरताना दिसून आली होती. त्यानंतर सुमारे आठ दिवसांनंतर प्रकाशावैजाली रस्त्यालगत दादराच्या शेतात निलगायने हरभरा, गहू, दादर आदी पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केल्याची घटना समोर आली होती. या संदर्भात स्थानिक शेतकऱ्यांनी वनविभागाकडे तक्रारी करीत यांचा बंदोबस्त करण्याची मागणी केल्या होत्या.मात्र, याकडे दुर्लक्ष होत आहे.

## आदिवासीबहुल दुर्गम भागात बालविवाह प्रथा मोडण्यासाठी समाज प्रबोधनाची गरज

### श्री बटेसिंग भैय्या रघुवंशी विधी महाविद्यालयात हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

प्रतिनिधी । नंदुरबार

**श्री. बटेसिंग भैय्या रघुवंशी विधी महाविद्यालयातर्फे राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, दुधाळे येथे आयोजित विशेष हिवाळी शिबिराचा दि.३० जानेवारी रोजी समारोप करण्यात आला.**

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून नंदुरबार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव न्या. महेंद्र पाटील हे उपस्थित होते. समारोपाच्या संदेशात त्यांनी नंदुरबार सारख्या आदिवासीबहुल दुर्गम भागात आजही बालविवाह ही प्रथा मोठ्या प्रमाणावर आहे आणि या बालविवाह पद्धतीमुळे समाजामध्ये अनेक समस्या निर्माण होत असतात. ज्यात प्रामुख्याने मुलीच्या आरोग्यविषयक समस्या तसेच मुलांना कायद्यांतर्गत अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगीतले. तसेच नंदुरबार जिल्ह्यात अक्कलकुवा, धडगावच्या अतिदुर्गम भागात डाकीण ही अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर दिसून येत असल्याने या दोन्ही समस्या सोडवण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे सेवक तसेच कायद्याचे विद्यार्थी म्हणून मदत होईल, अशी आशा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे समन्वयक डॉ.एम.एस.रघुवंशी यांनी विद्यार्थ्यांना जलसंपदा व पाणी अडवण्याच्या पद्धती यावर विस्तृत माहिती दिली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ.आशा तिवारी यांनी करताना शिबिरात शिबिरार्थींनी कायदा सहायता, मतदार जनजागृती, महिला सबलीकरण, आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण, पर्यावरण संवर्धन इत्यादी विषयांची माहिती जाणून घेतल्याचे सांगितले. तसेच यापुढे ही माहिती समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत कशी पोहोचवता येईल व समाजाला त्याचा कसा लाभ होईल यासाठी प्रयत्न करायचे असे आवाहन शिबिरार्थींना केले. कार्यक्रमात सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.दिनेश गावित, डॉ.एस.एस. हसानी, स्वयंसेवक राम पवार, तात्या पवार, उन्नती दावानी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वयंसेवक हर्षल शिंदे यांनी केले. आभार स्वयंसेविका शुचिता सोनार यांनी केले. शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा मंडळ संस्थेचे माजी चेअरमन अशोक अहिरे व शाळेचे मुख्याध्यापक व कर्मचारी वर्गाने शिबीर आयोजनात मोलाचे सहकार्य केले.

नंदुरबार तालुका विधायक समितीचे चेअरमन आ. चंद्रकांत रघुवंशी, व्हा. चेअरमन मनोज रघुवंशी, सचिव यशवंत पाटील व संचालक मंडळाचा प्रोत्साहनाने व प्राचार्य डॉ. एन. डी. चौधरी यांच्या मार्गदर्शनामुळे तसेच सर्व स्वयंसेवक, स्वयंसेविकाच्या, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहयोग लाभले.

# गावाच्या लोकसंख्येपेक्षा विकासकामांची गरज महत्त्वाची : पालकमंत्री

## जळगाव तालुक्यात कोट्यवधींच्या कामांचे भूमिपूजन अन् लोकार्पण

**प्रतिनिधी । जळगाव**

ग्रामीण भागातील रस्ते, स्वच्छता व सार्वजनिक सुविधा मजबूत झाल्याशिवाय सर्वांगीण विकास शक्य नाही. त्यामुळे निधी मंजूर करताना केवळ गावाची लोकसंख्या न पाहता त्या गावाची नेमकी गरज काय आहे, हे पाहूनच कामांना मंजुरी दिली जात आहे. गरज लहान असो वा मोठी, प्रत्येक काम महत्त्वाचे आहे. गावाचा विकास हवा असेल तर गावात एकजूट असली पाहिजे. मतभेद असू शकतात, पण विकासाच्या प्रश्नावर सर्वांनी एकत्र यावे. तुमच्या प्रत्येक चांगल्या कामासाठी मी पालकमंत्री म्हणून तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी दिली. ते ममुराबाद, विदगाव, आवार, तुरखेडा, बेळी, जळगाव खुर्द, निमगाव व खिर्डी या गावांमध्ये नुकत्याच झालेल्या विविध कोट्यवधी रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण प्रसंगी बोलत होते.

सुरुवातीला महिलांच्या औक्षणाने, फटाक्यांच्या आतषबाजीने व ढोल-ताशांच्या गजरात प्रत्येक गावात पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांचे भव्य स्वागत करण्यात आले. काही ठिकाणी गावागावांतून पायी मिरवणूकही काढण्यात आली.

**या कामांचे झाले भूमिपूजन व लोकार्पण**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत



ममुराबाद ते खेडी या ५.७३ किमी लांबीच्या रस्त्याचे दर्जोन्नतीकरण करण्यासाठी ५ कोटी १७ लक्ष रुपये, तसेच विदगाव ते कानळदा या ३.६५ किमी रस्त्याचे दोन ठिकाणी स्लॅब मोऱ्या बांधकामासह दर्जोन्नतीकरणासाठी ३ कोटी १८ लक्ष रुपये मंजूर असून, या दोन्ही रस्त्यांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. याच कार्यक्रमात ममुराबाद येथे गावांतर्गत ब्लॉक बसविणे, स्मशानभूमीला संरक्षण भिंत, स्मशानभूमीपर्यंत सौरदिवे, गटार बांधकाम, उर्दू शाळेत शौचालय बांधकाम व कब्रस्तानला संरक्षण भिंत; तुरखेडा येथे गावांतर्गत कॉंक्रिटीकरण, विदगाव येथे गावांतर्गत कॉंक्रिटीकरण व जिल्हा परिषद शाळेच्या वर्गखोल्यांचे बांधकाम, बेळी येथे स्मशानभूमी बांधकाम व गावांतर्गत कॉंक्रिटीकरण, निमगाव येथे अंगणवाडीचे लोकार्पण, ग्रामपंचायत कार्यालय व स्मशानभूमीला संरक्षण भिंत, जळगाव खुर्द येथे गावांतर्गत कॉंक्रिटीकरण व स्मशानभूमी पोहोच रस्ता, तर खिर्डी येथे स्मशानभूमी बांधकाम व गावांतर्गत ब्लॉक बसविणे या कामांचेही भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. प्रास्ताविक जिल्हा परिषदेचे तत्कालीन सदस्य प्रतापराव पाटील यांनी केले. सूत्रसंचालन कृषी सहाय्यक सचिन बाविस्कर यांनी केले. आभार विभाग प्रमुख युवराज पाटील यांनी मानले.

### ➤ यांची होती उपस्थिती

**या कार्यक्रमास शिवसेनेचे तालुका प्रमुख शिवराज पाटील, पं. स. माजी सभापती ललिता सपकाळे, जनार्दन कोळी, उपनगराध्यक्ष पंकज महाजन, उपतालुका प्रमुख स्वप्निल सोनवणे, महेश चौधरी, तुषार महाजन, माजी सरपंच भरत शिंदे, विलास सोनवणे, संतोष कोळी, महेंद्र कोळी, तसेच सरपंच अक्षय पाटील, प्रवीण पाटील, नितीन सपकाळे, उषा पाटील, शोभा धनगर, जयश्री चौधरी, दिनेश पाटील, विभाग प्रमुख युवराज पाटील, डॉ. कमलाकर पाटील, कैलास चौधरी, माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, गजानन सोनवणे, चेतन पवार, गिरीश भोळे, उपअभियंता जितेंद्र सोनवणे, वीरेन पाटील, भाजपा पदाधिकारी गोपाळ भंगाळे, मिलिंद चौधरी, पोलीस पाटील संतोष पाटील, ग्रामपंचायत सदस्य इंदिरा पाटील, अनिता धनगर, मंगलाबाई भिल, जयंत पाटील, अरुण पाटील, संजय नाले, मेघा नाले, भारती बागडे, सुनील काळे, कुंदन पाटील, संतोष सपकाळे, बंडू पाटील, जितू पाटील, मोगली बाबा ठाकरे, युवासेनेचे राम काटोले, अजय महाजन तसेच विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## थोडक्यात

### ॲनी दाखले हिची इस्त्रो टूरसाठी निवड

**चाळीसगाव ।** डॉ. होमीभाभा फौउंडेशन परीक्षेत गुड शेफर्ड अकॅडमीची इयत्ता १० वीची विद्यार्थिनी ॲनी डॅनियल दाखले हिने यश संपादन करत संपूर्ण महाराष्ट्रातून दुसरा क्रमांक प्राप्त केला. या नेत्रदीपक यशासोबतच तिची इस्त्रो टूरसाठी निवड झाली. ॲनी ही शाळेचे प्रिंसिपल डॅनियल दाखले यांची कन्या आहे. लहानपणापासूनच अभ्यासात गोडी असणारी ॲनी हिने वडिलांकडून प्रेरणा घेत अलौकिक यश संपादन केले. तीचे यश वडिलांसाठीच नव्हे तर संपूर्ण शाळेसाठी अभिमानाची बाब आहे. तिच्या यशात वडील, प्रिंसिपल डॅनियल दाखले व शाळेचे शिक्षक शैलेंद्र मराठे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### धोकादायक इमारती जिल्हा परिषदेकडून निर्लेखित करणार

**जळगाव ।** जिल्हा परिषद मालकीच्या जिल्ह्यातील वापरात नसलेल्या जीर्ण व धोकादायक ठरलेल्या इमारती व कार्यालय निर्लेखित करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे. ही मोहीम जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या आदेशानुसार राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात विविध ठिकाणी जिल्हा परिषदेच्या मालकीच्या अनेक कार्यालयीन इमारती सध्या वापरात नाहीत. दीर्घकाळापासून देखभाल न झाल्यामुळे या इमारती जीर्ण झाल्या आहे. काही ठिकाणी त्या नागरिकांच्या सुरक्षिततेस धोका निर्माण करणाऱ्या ठरत आहेत. अशा अडगळीत पडलेल्या व निरुपयोगी झालेल्या इमारतींची तपासणी करून त्या निर्लेखित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेमुळे भविष्यात संभाव्य अपघात टाळण्यास मदत होणार असून, जिल्हा परिषदेच्या मालमत्तेचे योग्य नियोजन करता येणार आहे.

# जळगावात आज पत्रकारांची वज्रमुठ

## गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाची महत्त्वपूर्ण बैठक!

### उत्तर महाराष्ट्रसह जिल्हा कार्यकारिणीची होणार निवड

**प्रतिनिधी । जळगाव**

पत्रकारांच्या हक्कासाठी आणि त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवणारी आक्रमक संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गर्जना महाराष्ट्र ग्रामीण पत्रकार संघाची महत्त्वपूर्ण बैठक आज दि.१ फेब्रुवारी रोजी जळगाव येथे आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीत संघटनेच्या उत्तर महाराष्ट्र व जिल्हाध्यक्षांसह जिल्हास्तरीय नूतन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर करण्यात येणार आहेत. ही महत्त्वाची बैठक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांची वज्रमुठ अधिक मजबूत करण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी या बैठकीचे विशेष आयोजन रविवार, १ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता पद्मालय शासकीय विश्रामगृह (रेस्ट हाऊस), जळगाव येथे करण्यात आले आहे. या बैठकीस केंद्रीय संस्थापक अध्यक्ष नरेंद्र कदम, केंद्रीय उपाध्यक्ष रविंद्र पवार, केंद्रीय महासचिव भगवान सोनार, केंद्रीय खजिनदार ललित खरे, केंद्रीय सदस्य गणेश पाटील, सुनील चौधरी, जोशीला पगारिया आदी पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पत्रकारिता क्षेत्रातील वाढती आव्हाने आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी संघटना सदैव तत्पर आहे. या बैठकीत केवळ नूतन कार्यकारिणीची निवडच होणार नाही, तर संघटनेच्या भविष्यातील कार्याची दिशाही निश्चित केली जाणार आहे. तरी जळगाव जिल्ह्यातील सर्व ग्रामीण व शहरी पत्रकार बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपली एकजूट दाखवावी, असे आवाहन संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे.

## अनिलकुमार पालीवाल यांना आज मानद डॉक्टरेट प्रदान होणार

**प्रतिनिधी । चोपडा**



**उत्तर महाराष्ट्र व सामाजिक क्षेत्रात पत्रकारिता व सामाजिक सेवेत अग्रणी व्यक्तिमत्व, ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक अनिलकुमार द्वारकादास पालीवाल यांना वृंदावन (मथुरा) येथील पंडित दीनदयाल उपाध्याय हिंदी विद्यापीठातर्फे सामाजिक सेवा क्षेत्रात पत्रकारितेच्या माध्यमातून केलेल्या उल्लेखनीय कामगिरी बद्दल दि. १ फेब्रुवारी रोजी विद्या वाचस्पती सारस्वत सन्मान पीएचडी डॉक्टरेट पदवी प्रदान केली जाणार आहे.**

हा कार्यक्रम बसंत विहार, हॉटेल रेडिसन ब्ल्यू नाशिक येथे आयोजित केला असून यात इतर क्षेत्रात उल्लेखनीय भूमिका बजावणाऱ्या मान्यवरांना देखील सन्मानित केले जाणार आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलपती डॉ. इंदूभूषण मिश्रा हे असून मुख्य अतिथी म्हणून पद्मश्री डॉ.अरविंद कुमार (कुलपती, झांसी) हे उपस्थित राहणार आहेत. तर मुख्य वक्ता डॉ. ऋतु दुबे, तिवारीजी (शिक्षाविद व साहित्यिक) हे मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी विश्व रेकॉर्डेड व पर्यावरणविद डॉ.विश्वनाथ पानिग्रही(छत्तीसगढ) हे उपस्थित राहणार आहेत.

## इतिहास-संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव देणारी साळवे इंग्रजी विद्यालयाची शैक्षणिक सहल आनंदोत्सवात



**प्रतिनिधी । धरणगाव**

**तालुक्यातील साळवे येथील साळवे इंग्रजी विद्यालयाची शैक्षणिक सहल नुकतीच उत्साहपूर्ण व आनंदी वातावरणात पार पडली.**

या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी कालीमठ, घृष्णेश्वर, वेरूळ येथील कैलास मंदिर, देवगिरी किल्ला, सिद्धार्थ गार्डन, प्राणी संग्रहालय, मत्स्यालय, बीबी का मकबरा तसेच पैठण येथील कारंजा आदी ऐतिहासिक, भौगोलिक व धार्मिक स्थळांना भेटी दिल्या. भेट दिलेल्या प्रत्येक स्थळी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.

किल्ले, घाट व प्राचीन वास्तू प्रत्यक्ष पाहून विद्यार्थ्यांनी इतिहास व संस्कृतीचा अनुभव घेतला. त्यांनी विविध स्थळांचे बारकाईने निरीक्षण करत महत्त्वाची माहिती नोंदवली. प्रत्यक्ष अनुभवातून मिळालेल्या ज्ञानामुळे विद्यार्थी अत्यंत उत्साही दिसून आले. सहलीचे नेतृत्व एस.पी.तायडे यांनी केले.

यावेळी ज्येष्ठ शिक्षक जी. व्ही. नारखेडे, शिक्षिका प्रतिभा पाटील, वर्षा नेहेते आदी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून सहल यशस्वी केली. अभ्यासपूर्ण सहलीतून परतलेल्या विद्यार्थ्यांचे ग्राम सुधार मंडळाचे चेअरमन डॉ.गिरीश नारखेडे, खजिनदार डॉ.चंद्रकांत नारखेडे, शालेय समितीचे चेअरमन डॉ.शशिकांत नारखेडे, सचिव रमेश बोरोले व कार्यकारिणीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापक एस.डी.मोरे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी कौतुक करीत शुभेच्छा दिल्या. ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, प्रेरणादायी व संस्मरणीय ठरली.

## ट्रेसर्स संघटनेच्या अधिवेशनात सेवानिवृत्त अनुरेखकांचा गौरव

**प्रतिनिधी । चोपडा**



नागरी गौरव सत्कार समारंभ हे कौतुकाचे आणि कृतज्ञतेचे माध्यम आहे. योग्य गुणांना आणि कर्तृत्वाला योग्य मंचावर सन्मानित करणे हे सुदृढ समाजाचे लक्षण आहे. हा समारंभ समाजाला प्रगतीच्या दिशेने घेऊन जात असतो या आशयाच्या पूर्ततेसाठी ट्रेसर्स असोसिएशन कृषी विभाग महाराष्ट्र राज्यांच्या संघटनेचे १२ वे राज्यव्यापी अधिवेशन परभणी जिंतूर रोडवरील श्रीहरी मंगल कार्यालयाच्या भव्य रंगमंच्यावर सेवानिवृत्त अनुरेखकांचा सपत्नीक आणि विविध क्षेत्रात यशस्वी व उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अनुरेखक अधिकारी, उद्योजक, व्यावसायिक, दुर्लक्षित उपेक्षित कलावंतांचा ट्रेसर्स संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्याचे अध्यक्ष वेंकटेश हालिंगे, उपाध्यक्ष व मुख्य संयोजक अंबादास क्षीरसागर, कोषाध्यक्ष विलास पोवार, सरचिटणीस जयप्रकाश कामडी, उपाध्यक्ष यशवंत जडे, उपाध्यक्ष नरेंद्र चव्हाण, उपाध्यक्ष केशव मदनकर, उपाध्यक्ष आर. आर.बनपुरे, उपाध्यक्ष तथा महिला प्रतिनिधी अश्विनी कोळेकर, कायदेशीर सल्लागार ॲड. सी. एस.शहाभाई आदींच्या हस्ते एकाच वेळी मंचावरती उपस्थित विभागनिहाय, जिल्हा निहाय पन्नास जोडप्यांचा सुहृद्य सत्कार सोहळा संपन्न करण्यात आला.

यावेळी पुणे विभागाचे नेतृत्व करणारे पुणे जिल्ह्याचे अध्यक्ष रामा पांढरे यांच्या नेतृत्वात पुणे विभागातील सोलापूर, अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील बंधू व भगिनी अनुरेखक पती-पत्नी यांचा सत्कार संपन्न करण्यात आला. त्यानंतर लातूर संभागातील प्रतिनिधी व विभागीय सचिव अंबादास क्षीरसागर व नंदकुमार परांडकर यांच्या नेतृत्वाखाली लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली व धाराशिव जिल्ह्यातील १५० पती-पत्नी अनुरेखक यांचाही यथोचित सत्कार करण्यात आला. त्यानंतर अमरावती विभागातील विभागाचे उपाध्यक्ष केशव मदनकर व विभागीय सचिव किशोर शास्त्रकार यांच्या नेतृत्वाखाली जवळजवळ ६० अनुरेखक जोडप्यांचा येथे सत्कार सोहळा पार पडला. त्यानंतर नागपूर संभागातील प्रतिनिधी, सरचिटणीस जयप्रकाश कामडी व विभागीय सचिव प्रकाश कडू यांच्या नेतृत्वाखालील अधिवेशनात सहभागी झालेले सुमारे ४० अनुरेखक जोडप्यांचा येथे सत्कार सोहळा संपन्न करण्यात आला. नाशिक विभागाचे उपाध्यक्ष यशवंत जडे व विभागीय सचिव किरण पाटील यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशनात सहभागी झालेल्या नंदुरबार, जळगाव, धुळे व नाशिक जिल्ह्यातील अनुरेखक जोडप्यांचा यथोचित सत्कार सोहळा संपन्न करण्यात आला. कोल्हापूर संभागातील प्रतिनिधी विलास पोवार, कोषाध्यक्ष व विभागीय सचिव आर. एम.चव्हाण व महिला प्रतिनिधी अश्विनी कोळेकर यांच्या नेतृत्वाखाली सांगली, कोल्हापूर व सातारा येथील सहभागी झालेले अनुरेखक पती-पत्नी ७० ते ७५ जोडप्यांचा सुहृद्य सत्कार सोहळा संपन्न झाला. त्यानंतर कोकण विभागाचे प्रतिनिधी तथा उपाध्यक्ष नरेंद्र चव्हाण व विभागीय सचिव सत्यजित कोमनाक यांच्या नेतृत्वाखाली ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील उपस्थित अनुरेखक व त्यांच्या सुविद्य धर्मपत्नी यांचा सत्कार करण्यात आला.


छत्रपती संभाजी नगर विभागाचे प्रतिनिधी उपाध्यक्ष आर.आर.बनपुरे, विकास निगवेकर व पद्माकर महामुनी यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशनात सहभागी झालेल्या अनुरेखक पती-पत्नींचा महाराष्ट्र राज्य संघटनेच्यावतीने जालना, बीड व छत्रपती संभाजी नगर या जिल्ह्यातील उपस्थित अनुरेखक बंधू आणि भगिनींचा सहपत्नीक सत्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष व्यंकटेश हालिंगे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ अनुरेखक व माजी सरचिटणीस भिकाजी सातव पुणे व संघटनेचे वरिष्ठ अनुरेखक मार्गदर्शक व कायदेशीर सल्लागार सी.एस.शहाभाई धुळे हे होते. सूत्रसंचालन प्रकाश कडू यांनी तर प्रस्ताविक जयप्रकाश कामडी यांनी केले. अधिवेशन संयोजक अंबादास क्षीरसागर यांनी आभार मानले.

# धरणगाव शहरात २ दिवस उशिराने होणार पाणीपुरवठा

## नागरिकांनी काटकसरीने पाणी वापरण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । धरणगाव**

**धरणगाव शहर पाणीपुरवठा विभागाअंतर्गत धावडा जलकेंद्र येथील जॅकवेलमध्ये साचलेला गाळ काढण्याचे अत्यावश्यक काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. या दुरुस्तीसाठी व स्वच्छता प्रक्रियेमुळे शहरातील पाणीपुरवठा येत्या एक ते दोन दिवस उशिरा होण्याची शक्यता असून, नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा जपून व काटकसरीने वापर करावा, असे आवाहन धरणगाव नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.**




धावडा जलकेंद्रातील जॅकवेलमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे पाणी उपसा प्रक्रियेत अडथळे निर्माण होत होते. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी तसेच सुरळीत व सुरक्षित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने हे काम हाती घेण्यात आले आहे. सदर काम पूर्ण क्षमतेने सुरू असून अधिकारी व कर्मचारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. या कालावधीत नागरिकांनी अनावश्यक पाण्याचा वापर टाळावा, साठवलेले पाणी जपून वापरावे तसेच नगरपरिषदेच्या कामकाजास सहकार्य करावे, असे आवाहन धरणगाव नगरपरिषद प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, काम पूर्ण होताच शहरातील पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात येईल, असे नगरपरिषदेचे पाणीपुरवठा विभाग अभियंता धनंजय कोठुळे यांनी स्पष्ट केले आहे.

## उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजलीसाठी अमळनेरात आज सर्वपक्षीय शोकसभा

**प्रतिनिधी । अमळनेर**

**राज्याचे उपमुख्यमंत्री, एक दमदार नेतृत्व, सर्वांचे लाडके नेते अजितदादा पवार दुर्दैवाने अकाली आपल्याला सोडून गेले. त्यांना सामूहिक आणि सर्वपक्षीय श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह, अमळनेर येथे शोकसभा आयोजित करण्यात आली आहे.**

अमळनेर तालुक्यातील सर्व नागरिक, राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, व्यापारी, शिक्षक, शासकीय कर्मचारी, आशा वर्कर्स, लाडक्या बहिणी, डॉक्टर्स, लायन्स, रोटरी, महिला मंडळ, निमशासकीय कर्मचारी, महसूल संघटना, वकील संघ, पत्रकार संघटना, धरण संघर्ष समिती, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, प्राध्यापक संघ, मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर तालुका फोटोग्राफर असोसिएशन, स्वामींनारायण संस्था, संत सखाराम महाराज वाडी संस्थान, भाजीपाला विक्रेते, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील, ग्रामसेवक, तलाठी, आजी व माजी नगरसेवक, एस.टी. कर्मचारी, टॅक्सी युनियन, सर्व समाज पंचमंडळ तसेच इतर सर्व संस्था यांना आवाहन करण्यात आले आहे. तरी सर्वांनी शोक सभेस आवर्जून यावे, असे आवाहन सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यावतीने केले आहे.